
श्रीमद् सद्गुरू

# प.पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे संक्षिप्त चरित्र




श्री सद्गुरू श्रीधर दत्तात्रेय सेवा प्रतिष्ठान, पुणे

लेखक - विद्यावाचस्पती अजित म. कुलकर्णी

श्रीमद् सद्गुरू

# प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर

## यांचे संक्षिप्त चरित्र



लेखक :
विद्यावाचस्पती अजित म. कुलकर्णी

श्री सद्गुरू श्रीधर दत्तात्रेय सेवा प्रतिष्ठान, पुणे.

मूल्य : रु. २०/-

■ **प्रकाशक**

**श्री सद्‌गुरू श्रीधर दत्तात्रेय सेवा प्रतिष्ठा**

३४६, शनिवार पेठ, नवीन मराठी शाळेसमोर,

पुणे - ४११ ०३०.

फोन : २४४८७०३०

■ **प्रथमावृत्ती** : २००९

**द्वितीय आवृत्ती** : २०१२


■ **मुद्रक**

संवाद ट्रेडप्रिंटस् प्रा. लि., पुणे

५९५, शनिवार पेठ, पुणे - ३०.

दूरभाष : ०२० - २४४८५६३२

# स्मृतिगंध



परमार्थाच्या प्रांगणात ज्यांचा सहवास लाभला, त्या वै. ग. या. तथा दादासाहेब नातूंच्या स्मृतीला अभिवादन! पू. दादासाहेबांना मृत्यू हा सुयोग्य वेळी आला. त्यांना श्री दत्तात्रेयाचे दर्शन झाले, तसेच, प. पू. दत्तमहाराजांचे ज्यांना विशेष प्रेम लाभले त्या पुण्य स्मृतिगंधास समर्पण.

* * *

*श्री दत्त जयंती १९०० दि. १४ / १२ / ७८ सायंकाळी*

*श्री दत्ता करितो इथोनि नमना जोडोनि दोन्ही कर*
*विश्वाचे मजका स्वरूप दिसती ना हो कधी विस्मर*

*नेमा नित्यच पाळणे कठिणही आले जरी प्रत्यया*
*माया नी ममता मनी रुजविली प्रत्यक्ष दत्तात्रेया*

*देशी दर्शन तू मलंग बनुनी श्री एकनाथाप्रति*
*त्याची अल्प चुणूक आज दिसली, माध्यान्ह काळाप्रति*

*आहे अज्ञ अजाण बाळक तुझा सेवे सदा सादर*
*ठायी ठायी मला दिसोनि उरशी तूं सत्य सर्वेश्वर*

*- ग. या. नातू*

॥ श्रीश्रीगुरवे नमः ॥

*यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा।*
*तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम्॥*

या पवित्र भारतवर्षात संतपुरुषांची अखंड मालिका सतत जन्माला येत आहे. त्यामुळे मानवी ज़ीवनाची कृतार्थता सामान्य मनुष्यांपर्यंत पोहोचविण्याची ईश्वरीय ''कर्तुमाकर्तुम् अन्यथा कर्तुम'' शक्ती अशा दिव्य विभूतिंच्या द्वारा प्रकट होत असते.

प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे अलौकिक व्यक्तिमत्वही वेदान्त प्रचुरे अशा सर्व घटनांनी नटलेले आहे.

'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते॥

त्यांचे असे तपःपूत जीवन हे सर्वांना आदर्शभूत असून त्यांच्या अलौकिक अनेक गुणांपैकी एखादा गुणही अंगी बाणविण्याचा प्रयत्न केला तरी आपले जीवन धन्य झाल्याविना राहणार नाही.

**'विद्या विनयेन शोभते'** याचे ते एक ज्वलंत उदाहरणच सर्वांना पाहावयास मिळाले. श्रेष्ठ प्रकारची विद्वत्ता, वेद शास्त्रांचा अखंड व्यासंग, धन-मान इत्यादी मिळूनही त्याचा (अहंकाराचा) कधीही स्पर्श झाला नाही.

श्रीमान डॉ. अजित कुलकर्णी यांनी लिहिलेले हे त्यांचे छोटेखानी दिव्य चरित्र सर्वांनाच लाभकारक आहे व या चरित्र वाचनाने निश्चित आत्मिक समाधान मिळेल असा विश्वास वाटतो.

ब्रह्मश्री श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे चरणी कोटी कोटी प्रणाम।

*दासानुदास*
*नारायण*
*(ना.य.ढेकणे)*
*प्रधान विश्वस्त*
*श्री वासुदेव निवास, पुणे*

॥ ॐ ॥

# श्री स्वामी जगद्गुरू शंकराचार्य पीठ करवीर

२२९९ डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर. फोन : ५२१५४५

सर्वधारी - १९३०, फाल्गुन कृ. ६/७, मंगळवार दि. १७/३/२००९

डॉ. अजित कुलकर्णी, पुणे

पीठस्थ देवतेंचे उत्तम आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण

कै. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांचे जन्मशताब्दिचे निमित्त त्यांचेच संक्षिप्त चरित्र आपण लिहित आहात. हा कौतुकास्पद उपक्रम आहे. एका महान व्यक्तिमत्वाला संक्षेपाने लोकांसमोर प्रगट करणे खरोखर अवघड आहे. हे अवघड कार्य तुम्ही सुलभ केले आहे. या सुलभीकरणात तेच तुम्हाला साहाय्यभूत झाले आहेत कारण ते 'दत्त' आहेत.

संत उक्तीप्रमाणे ''शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी'' असेच म्हणावे लागेल. शुद्ध धर्माचरण कसे असावे म्हणून निर्देश करायचा झाला तर दत्तप्रसादरूपी पू. दत्तमहाराजांकडे पाहावे लागेल. संत चरित्र किंवा आध्यात्मिक ग्रंथाप्रमाणे- उपक्रमोपसंहार - एक व्हावा.

वाचकांना हा ग्रंथ भक्तिप्रेम वाढविणारा ठरावा. संतांचे गुणगान ही एक भक्तिच आहे.

पुनःश्च एकदा पीठस्थ देवतांचे आशीर्वाद व आमचे 'नारायण-स्मरण' सर्वांस विदित व्हावे.

महानुशासनम् वरीवर्ति<br>
श्री. जगद्गुरू शंकराचार्य<br>
करवीर पीठ, कोल्हापूर

# ..... मनोगत .....

कैवल्याचा अधिकारी। मोक्षाची सोडी बांधी करी।
की जळाचिये परि। तळवटू घे ॥
म्हणोनिया नमस्कारू। तयाते आम्ही माथा मुकुट करु।
तयाची टांच धरू। हृदयी आम्ही॥

*- श्री ज्ञानेश्वरी अध्याय १२, २२०/२२१*

श्री ज्ञानदेवांच्या शब्दांतून व्यक्त होणाऱ्या भावातून श्री सद्गुरू पू. दत्तमहाराज कवीश्वर यांचे संक्षिप्त चरित्र सर्वांसमोर ठेवताना आनंद वाटतो. सन २००९-१० हे पू. दत्तमहाराजांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यामुळे हा अपूर्व योग वाटतो.

पू. दत्तमहाराजांचा व माझा ऋणानुबंध हा एका महत्त्वाच्या घटनेतून साकार झाला. ती घटना अशी की, पू. श्रीधरस्वामी यांनी श्रीक्षेत्र वरदपूर, येथे १९७३ मध्ये समाधी घेतली. त्या वेळी मी तेथे गेला होतो. सर्व वातावरण अत्यंत उदासीन होते. मी सर्वांच्या मानाने वयाने खूप लहान होतो. त्यामुळे खूप खूप रडलो. ज्या ठिकाणी पू. श्रीधरस्वामींचा देह गुफेबाहेर आणून ठेवला होता तेथे समोर विषण्ण मनाने बसलो होतो. त्या वेळी मध्यरात्री त्या देहातून एक दिव्य प्रकाश झोत दिसला आणि तो प्रकाश कुठपर्यंत गेला हे पाहत राहिलो, त्या प्रकाशाच्या झोतात एका औदुंबराच्या झाडाखाली; पू. दत्तमहाराजांची अत्यंत तेजस्वी विभूती दिसली आणि स्वामींचा कोमल मधुर ध्वनी कानावर आला, ''बाळा, आता या कुडीतील तेज विश्वंभर झालं बरं कां! पण तुझ्या करिता या ठिकाणी मी आहे हे जाणून घे.'' मनाला एक निरामय शांत वाटले. त्या दिव्य प्रकाशातील या विभूतीचे दर्शन घेत घेत मी भावसमाधित किती काळ होतो हे माहिती नाही. असो.

मी वरदपूर येथून परत आल्यावर ही घटना वै. दादासाहेब नातूंना सांगितली. मग मी व नातू पू. दत्तमहाराजांच्या घरी वर्तक वाड्यात गेलो. त्यांना ही सर्व घटना सांगितली. तेव्हा महाराज म्हणाले, ''अहो, श्रीधरस्वामी फार मोठे अधिकारी, दत्तावतारी! त्यांचेही आमचेवर विशेष प्रेम. पण त्यांनी सांगितले ना, मग आपण येत जा. आमचा अजित व तुम्ही आम्ही दोन समजत नाही. पण तूर्त कोणास बोलू नका. आपला हा भावानंद ! उगीच कोणालाच त्रास नको''.

त्यानंतर मी पू. दत्तमहाराजांनी देह ठेवल्यावर काही जणांशी बोललो व हे सगुण चरित्र सर्वांपुढे सादर करावे हा विचार सूचविला, या एका प्रेमापोटी ही शब्दफुलांची सेवा आहे.

''**सगुणचरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी ॥**'' संत एकनाथ महाराज म्हणतात त्याप्रमाणे हे भगवतांचे गुणगान आहे. एक स्थिती अशी असते की, देव व भक्त एक होतात आणि 'आनंद अद्वय नित्य निरामय' यातून परमात्म्याचे सगुण -निर्गुण उभय स्वरूप व्यक्त होत असते.

धर्म, ज्ञान, भक्तीचे प्रचार व प्रसाराचे कार्य, पू. दत्तमहाराजांचे कार्य '**यद्यद्विभूतिमत्सत्त्वं**' प्रमाणे असल्यामुळे पू. दत्तमहाराज भगवद्विभूतीरूप होते हे सिद्ध होते.

जगद्‌गुरू शंकराचार्य महाराजांनी म्हटले आहे तसे,

*'जंतूनां नरजन्म दुर्लभमतः पुस्त्वं ततो विप्रता।*
*तस्माद्वैद्विकधर्ममार्गपरता विद्वत्वमस्मात्परम्।*

असे वर्णन केले आहे. असे हे पू. दत्तमहाराजांचे चरित्र आहे.

पू. योगिराज गुळवणीमहाराजांनी श्री नारायणस्वामींचे चरित्र (मराठी) पुस्तकात पू. दत्तमहाराजांचा उल्लेख 'दत्तस्वरूपी' असा केला आहे. अशी थोर विभूती पुण्यनगरीत होवून गेली हे पुण्याचे वैभव म्हणता येईल.

सध्या पू. ताईमहाराजांनी जालना येथे श्री दत्ताश्रमात पू. दत्तमहाराजांच्या 'चरण पादुकां'चे मंदिर उभे करून फार मोठे योगदान केले आहे. आम्हासारख्या साधक, संसार पिडीत लोकांना एक स्थान निर्माण करून एक विसावा प्राप्त झाला आहे.

या चरित्रास श्रीमद् जगद्‌गुरू शंकराचार्य विद्या नृसिंह भारती करवीर पीठ, यांचे थोर आशीर्वाद लाभले आहेत. त्यांचे मार्गदर्शन हे नेहमीच मोलाचे असते. त्यांनीही उदार अंतःकरणाने यास आशीर्वाद दिले याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

त्याचप्रमाणे योगतपस्वी नारायणकाकामहाराज ढेकणे प्रधान विश्वस्त, वासुदेव निवास यांनीही आशीवाद दिले आहेत. हे योगपीठ पू. दत्तमहाराजाचे जीवनाचे कार्यक्षेत्र होते त्या पीठाचे हे आशीर्वाद निश्चित आनंददायक आहेत.

त्याचप्रमाणे पू. दत्तमहाराज कवीश्वर कुटुंबीयांचा आभारी आहे. तसेच श्री. श्रीराम गाडगीळ व श्री उमेश वेचलेकर यांनीही मुद्रण कार्यात मोलाची कौतुकाची छाप देणारा मित्रवर्ग, पारमार्थीक सहकाऱ्यांचा आभारी आहे.

या सद्‌गुरूंच्या चरित्र वाचनातून शुद्ध व उत्तम आचार विचारांची सद्‌बुद्धी सर्वांना होवो आणि

***दुरितांचे तिमीर जावो। विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो।***
***जो जे वांछीले तो ते लाहो। प्राणिजात।।***

ही ज्ञानदेवांची मनोकामना सुफल होवो ! ही सर्वांतर्यामी सर्वाधी प्रेरक भगवान दत्तात्रेय चरणी प्रार्थना !

सद्‌गुरूचरणारविंद

अजित कुलकर्णी

## आरती

करीतो आरती ऽऽ सद्गुरू, दत्तमहाराजांची ॥धृ॥
मायेच्या योगे प्रभुदत्त, अवतरे या अवनी।
संकटी रक्षसी भजका, भासे भास्कर जीवनी॥१॥
धर्म, ज्ञान, कर्म, भक्ती, प्रसार तो करूनी।
साधका शांती सुख, वर देई ही संजीवनी॥२॥
वेदघोषे अहर्निश, यज्ञयागे संतोषले ईश।
भागवत कथा प्रेमे, अन्नदाने प्रकटले ईश॥३॥
पूर्णज्ञान वात्सल्य, प्रकटे तव नयनी।
पावन केले स्थाना, जेथे-तेथे जाऊनी॥४॥
शरण आलो तव चरणी हो, गुरूराज माऊली।
तनु मन अर्पुनी अजित, प्रार्थितो कृपा सावली॥५॥

*- डॉ. अजित कुलकर्णी*

## तेजस्वी

**प** रम महाराज मी करीतसे तुम्हा वंदन
**पू** जनीय ज्ञानाचा पसरे सुगंध जगती चंदन
**द** त्ताचे कृपे जगती या विभूती पृथ्वीवरी जन्मल्या
**त्त** हाती शिदोरी देत भक्ता भागवत निःसंकोचल्या
**म** हान तेजस्वी तनुही गहिरी कांती मुखश्रीवरी
**हा** भाव विशाल बुद्धिही बरवी दावीत मुद्रेवरी
**रा** हुनी सन्निध मज तरी गुरू अज्ञान लागो थिजे
**ज** मती एकांती साधना गुलाबकलिका तेजस्वी जे
**क** धीही उठावदार व्यक्तिमत्त्व शोभते शालिनता
**वी** रक्ती विराजे गळ्यात प्रसन्नवदनी गंभीरता
**श्व** रा आशीर्वाद शिरावरी मज द्या मानस प्रेरणा
**र** मावे हरिनाम घेऊनी सदा ध्येयास ही प्रेरणा

*- डॉ. अजित कुलकर्णी*

॥ॐ॥

## ॥ श्री सद्‌गुरू ब्रह्मर्षी श्रीदत्तमहाराज कवीश्वर ॥

ब्रह्मर्षी, राष्ट्रीय पंडितांचे पूर्ण नाव दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर असे आहे! यांचे मूळ घराणे महाराष्ट्रातील नगर जवळच्या मांडवगण या गावचे ! हे कुटुंब देशस्थ यजुर्वेदीय माध्यंदिन शाखेचे. गोत्र उपमन्यू ! पू. दत्तमहाराजांचा जन्म नरसोबाची वाडी येथे माघ कृष्ण षष्ठी शके १८३१, बुधवार, दि. २ मार्च, १९१० रोजी सूर्योदयसमयी सकाळी ६.२० वाजता झाला.

### कवीश्वर घराण्याचा पूर्व इतिहास

कवीश्वरांचे मूळ आडनाव 'सप्तर्षी' हे होते. मांडवगण ही भूमी मांडव्य ऋषींची तपोभूमी आहे. या गावात पुरातन शिव मंदिर आहे. या गावात पूजनीय महाराजांचे पूर्वज राहात होते. तेथे ते श्री दत्तमंदिरात पुजारी म्हणून काम पाहात होते. तसेच, तेथे वैदिक कार्यही करीत असत. या घराण्यात दादा सप्तर्षी होवून गेले. यांनी मोरगाव येथे उपासना केली होती. त्यांनी श्री गणेश योगेंद्रमहाराज यांचेकडून श्री गणेश मंत्रोपासना घेतली होती. हे गणेश योगेंद्रमहाराज म्हणजे मुद्गल पुराणाचे भाष्यकार होते. यांचे विशेष म्हणजे त्यांनी नुसत्या दूर्वांच्या रसावर वर्षभर राहून श्री गणेशाची उपासना केली होती. त्या

वेळी त्यांना श्री गणेशाची एक स्वयंभू मूर्ती मिळाली. तेव्हा त्यांना स्वप्नात एका ब्राह्मणाने दर्शन देऊन सांगितले की, "तुझ्या घरात पुराण पारंगत विद्वान जन्माला येतील." अशा प्रकारे या घराण्याला थोर आशीर्वाद प्राप्त झाले.

तथापि, तो काळ पारतंत्र्याचा होता. राजकीय सत्ता इस्लामी होती. या राजकीय स्थितीचा त्यांना अत्यंत त्रास होत असे. या त्रासाला कंटाळून ते सातारा जिल्ह्यातील वाई या गावी स्थलांतरीत झाले. या क्षेत्राचे महाभारतकालीन नाव वैराज क्षेत्र किंवा विराट नगरी हे होते, येथे त्यांनी वास्तव्य केले.

या घराण्यात भालचंद्रशास्त्री हे होऊन गेले. हे मोठे आध्यात्मिक अधिकारी होते. त्यांना 'दाजी' असे म्हणत असत. हे दादा सप्तर्षींचे नातू होत. हे घराणे मंत्रशास्त्रात निष्णात होते. तसेच, या घराण्यात प्रथम पुत्र मंत्रदीक्षा देत असल्याने, यांचे आडनाव सप्तर्षी जावून 'दीक्षित' हे झाले. भालचंद्रशास्त्रींना लोक 'दाजी दीक्षित' म्हणू लागले. हे दाजी दीक्षित रामायण, महाभारत, भागवत ग्रंथांवर प्रवचन करीत असत. तसेच, हे श्रौतस्मार्तयाज्ञिक कर्मात निष्णात होते. धर्मशास्त्रातही ते एक तज्ज्ञ पंडित म्हणून समजले जात असत. ते एक प्रतिभासंपन्न कवी होते. त्यांनी संस्कृत व प्राकृतात

अनेक आख्याने रचिली आहेत. यांच्याच चुलत घराण्यात श्री. खंडा दीक्षित म्हणून एक जण होऊन गेले. ते यज्ञ कर्मात निष्णात असल्याने त्यांनी याज्ञिक कर्मावरचा ग्रंथ लिहीला आहे.

अशा नावलौकिकामुळे सातारच्या दरबारात धर्मशास्त्राच्या निर्णयासाठी दाजी दीक्षितांना नेहमी बोलावीत असत. एकदा त्यांच्यावर बाका प्रसंग आला. ज्या काही निर्णयासाठी त्यांना बोलाविणे आले, त्यात कटूता येऊन संकट निर्माण होईल, हे पाहून सर्वस्वाचा त्याग करून ते श्री क्षेत्र नरसोबाची वाडी येथे निघून गेले. अशी जाज्वल्य धर्मनिष्ठा या घराण्यात होती.

श्री क्षेत्र नरसोबाची वाडी येथे, श्री दत्तात्रेयांची उपासना दाजी दीक्षितांची सुरू झाली. कृष्णा नदीचे स्नान जप-जाप्य, श्री गुरुचरित्र ग्रंथाची पारायणे, याने ते अधिकच अंर्तमुख बनले. आध्यात्मिक चिंतन अधिक होऊ लागले. संस्कृतचे अभिजात ज्ञान असल्याने रोज पाच श्लोक, श्री दत्तप्रभूच्या चरणी समर्पित करू लागले. उत्तम प्रासादिक काव्यरचना करीत असत. त्यांच्या काव्य समर्पणामुळे लोक त्यांना 'कवीश्वर' म्हणू लागले.

श्री नृसिंह सरस्वतींच्या स्वप्नातील आदेशाप्रमाणे ते

वाडी क्षेत्रात राहू लागले. त्यांना कागवाडच्या श्री. फणसाळकरांनी राहण्यासाठी वाडीत वाडा दिला. कुरूंदवाडच्या संस्थानिकांनी अनगोळ माधवपूर (वडगाव) व तिकोरा येथे घराण्याला इनाम म्हणून जमिनी दिल्या. असा हा घराण्याला ईश्वराचा कृपाशीर्वाद प्राप्त झाला.

श्री क्षेत्र वाडी येथे श्री दादा दीक्षितांनी 'विद्यागणेश' व 'वांछाकल्प' च्या पाठाची उपासना केली होती. तसेच श्री दत्तात्रेयांची वाडीतही उपासना केली होती. त्याचप्रमाणे दाजी कवीश्वरांना घावडशीच्या श्री ब्रह्मेंद्र स्वामींचा सहवास व कृपाशीर्वादही प्राप्त झाले होते.

श्री दाजी कवीश्वरांच्या पत्नी सौ. सगुणाबाई याही धार्मिक होत्या. त्यांना दाजींनी सांगितले की, "श्री दत्ताला रोज १०८ प्रदक्षिणा घालीत जावे व तसा जपही करावा." त्यानंतर त्यांनी ही सेवा निष्ठेने केली होती. त्या वेळी आश्विन वद्य चतुर्थीला, (संकष्टी चतुर्थीला) माध्यान्ह काळी शुभ मुहुर्तावर सौ. सगुणाबाई प्रसूत झाल्या, त्यांना पुत्र झाला. त्याचे नाव 'वक्रतुंड' असे ठेविले होते.

दाजी कवीश्वरांचे संस्कार वक्रतुंड कवीश्वरांवर झाले होते. त्यांचे यजुर्वेदाची वेद संहिता, याज्ञिक पंच प्रयोग, उपनयनादि संस्कार प्रयोगाचे शिक्षण दाजींकडे झाले. तसेच,

बाळशास्त्री दीक्षित व लक्ष्मणशास्त्री यांचेकडे संस्कृत व व्युत्पत्तीशास्त्र शिकले. ते अत्यंत कुशाग्र बुद्धीचे व त्यांची पाठांतर शक्तीही प्रगल्भ होती. ते महाभारत, रामायण व भागवताचे सप्ताह करीत असत. त्याचप्रमाणे त्यांना वक्तृत्त्वाची अलौकिक देणगी होती.

वाडीला सायंकाळी, प्रदोष पूजेच्या वेळी स्नानापासून पोषाख करून स्वारी पालखीत बसण्यास निघेपर्यंत वक्रतुंड शास्त्रीबुवा नित्यनेमाने पुराण सांगत असत. वाडीत श्री. गोविंदस्वामी द्रविणऐच्या नावाचे फार मोठे अधिकारी संत होते. त्यांनी वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामींना मंत्रदीक्षा दिली होती. अशा अधिकारी स्वामींची सेवा वक्रतुंडबुवा करीत असत.

वक्रतुंडांची पत्नी सौ. सावित्रीबाई या फलटणाच्या कोचकांची कन्या! तेव्हा वक्रतुंडमहाराजांच्या संसारात एक न्यूनता होती, त्यांची अपत्ये जगत नव्हती. ही व्यथा त्यांनी गोविंदस्वामी यतिंना सांगितली. ते म्हणाले, "तू संन्यास कसला घेतोस, तुझी संतती यापुढे वाचेल. तुझ्या कुळात अलौकिक पुत्र-पौत्र जन्माला येणार आहेत". तुझा विश्वास बसावा म्हणून, ते म्हणाले, "मी तुला आत्ताच बाळ देतो!" हे सांगून स्वामींनी स्वतःजवळची श्री दत्तमूर्ती वक्रतुंडशास्त्रींच्या हातात दिली.

वक्रतुंडबुवांना आनंद वाटला. या मूर्तीचे नामकरण 'दत्तूबाळ' म्हणून करण्यात आले. एका मुलाप्रमाणे या मूर्तीवर सर्व संस्कार होऊ लागले. त्याला रोज न्हाऊ -माखू घालण्यापासून सारे संस्कार सुरू झाले. या बालकाला कडीतोडे, अलंकार, पाळणा इ. सारे सोपस्कार होऊ लागले. त्याचा व्रतबंधादि संस्कारही थाटामाटात झाला. प्रवासातही वक्रतुंडबुवा ही मूर्ती बरोबर ठेवत असत.

वक्रतुंडबुवा अत्यंत त्यागी आणि निःस्पृह होते. त्यांचे बंधू श्रीरामशास्त्री यांनी वाडीत श्री मौनीस्वामी आणि गोंविदस्वामी यांच्या उपस्थितीत यज्ञ केला, तो उत्तम झाला, पण त्यात त्यांना कर्ज झाले. बंधूही गेले. रामशास्त्रींचा मुलगा गणेशशास्त्री होता. त्याला सावकार त्रास देऊ लागले. तेव्हा वक्रतुंडबुवांनी त्या कर्जाची जबाबदारी घेऊन, काका व पुतण्यांनी गावोगावी प्रवचने, सप्ताह करून हे कर्ज फेडले. अशी त्यांची उदारवृत्ती होती. 'जेष्ठो भ्रातः पितुः समः।' या न्यायाने पितृऋण व कुलऋणातून ते मुक्त झाले. श्री मौनीस्वामींचे नाव 'प्रद्युम्नानंद सरस्वती स्वामी' आणि श्री गोंविदस्वामींचे नाव 'ब्रह्मय्यास्वामी' होते. ह्या विभूती पू. टेंबेस्वामींचे मोक्षगुरू होते.

वक्रतुंडबुवांची दोन अपत्ये, एक धुंडिराज व कन्या

नर्मदा ही जगली. सन् १९०७ च्या जन्माच्या तिथीला म्हणजे आश्विन वद्य चतुर्थीला त्यांचे निर्वाणही झाले.

वक्रतुंडबुवांचा अधिकार इतका मोठा होता की, राजूरच्या श्री गणेश मंदिरात त्यांनी गणेशाला नैवेद्य समर्पण केला होता, तर गणेशाने प्रत्यक्ष आपल्या शुंडेने मोदक ग्रहण केले होते. अशा अधिकारी पुरुषाने अखेर पत्नीस सांगितले की, "कर्ज करणे फार वाईट! मी या कर्जापायी फार कष्ट भोगले. तुम्ही शक्य तो मिळेल तितकाच खर्च करावा, कर्ज कधीही काढू नका." हा संदेश जणू सर्वांसाठी त्यांनी दिलेला दिसतो.

वक्रतुंडबुवांचे अपत्य धुंडिराज हे होते. पू. गोविंदस्वामींची सेवा श्री गणेश व दत्तउपासनेचे फळ म्हणजे हे अपत्य म्हणून यांचे नाव 'धुंडिराज' हे ठेवले. परंतु वक्रतुंड महाराज मात्र त्यांना 'दत्तुबाळ' म्हणूनच म्हणत असत. कारण श्री गणेश व श्री दत्त यांच्या अभिन्नत्वाची त्यांची दृढबुद्धी होती. अशा प्रकारे प्रत्येक पिढीतील एक-एक जण दैवी गुण संपन्न व अदृष्ट पुण्यकर्माचे फळ प्राप्त झालेले होते.

धुंडिराजमहाराजांचे बालपणही वाडीतच गेले. प्राथमिक शिक्षण पिताजींकडून झाले. शालेय शिक्षण श्री. दामोदरपंत गोखले यांचेकडे झाले. त्यानंतर श्रीकृष्णशास्त्री वष्ट यांचेकडे संस्कृत पाठशाळेत वैदिक संहिता, षोडश संस्कार, काव्य

अलंकार, छंद इत्यादींचा अभ्यास पूर्ण झाला. पुढे श्रीकृष्णाशास्त्री इंदौरला गेले. म्हणून धुंडिराजही इंदौरला गेले व तेथे आपले शिक्षण पूर्ण केले. त्या वेळी न्यायशास्त्र, वाक्वृती, पंचलक्षणे, सामान्य निवृत्ती इ. चे अध्ययन झाले. ज्ञान उदंड होते. त्यांना अनेक शिष्यवृत्त्या मिळाल्या होत्या. त्यानंतर सांगलीच्या वेदपाठशाळेत त्यांचे शिक्षण झाले. न्याय व व्याकरण येथे पूर्ण झाले. अशा प्रकारे वेद, वेदांत, धर्मशास्त्र, काव्यालंकार, न्यायशास्त्र अशा गहन विषयांचे त्यांनी अध्यायन पूर्ण झाले. पुढे श्री गणेश व श्री दत्तोपासना करून पुरश्चरणयुक्त जप केले. त्यांचा विवाह शिरहट्टी येथील हणमसागर यांचे कन्येबरोबर १९०४ साली झाला. सौ. सरस्वतीबाई यांनीही सासऱ्याच्या आज्ञेने देवीची उपासना केली होती. त्याही अत्यंत पतिनिष्ठ, दैवी गुणसंपत्तीने परिपूर्ण होत्या. याही वाडीत देवाला १०८ प्रदक्षिणा घालीत असत. जप करीत असत. धुंडिराजमहाराजांची टेंबेस्वामींवर अनन्य श्रद्धा व भक्ती होती. धुंडिराजमहाराज आत्मज्ञानी, साक्षात्कारी, पंडित असूनही स्वभाव व वागणे साधे व प्रेमळ होते. वडिलांप्रमाणेच भागवत सप्ताह, महाभारत, रामायण सांगत असत. तसेच गुरूउपदेशाची मंत्रदीक्षा देत. स्वतःच्या गोष्टी स्वतः करीत. त्यांचा शिष्यवर्गही मोठा आहे. सर्वांशी ते प्रेमाने बोलत.

तशाच त्यांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई पण महासाध्वी होत्या. त्यांनाही मानणारे अनेक जण आहेत. त्यांनाही वाचासिद्धी प्राप्त होती. त्यांची उपासनाही फार मोठी होती. 'दत्तू बाळ' या मूर्तीची मनोभावे सेवा केली होती. धुंडिराज महाराजांचे व पत्नीचे वास्तव्य हे देऊळगावराज विदर्भात होते. तेथे त्यांचा फार मोठा शिष्य वर्ग आहे. त्यांची समाधी सुलतनापूर येथे आहे.

अशा दैवी गुणसंपत्तीच्या दापत्यांनी टेंबे स्वामींच्या आज्ञेप्रमाणे पुत्रप्राप्तीसाठी विधिविधानपूर्वक होमहवनादिच्या सांगतेने जपानुष्ठान केले. त्याचा प्रसाद म्हणूनच, माघ वद्य ६ ला बुधवारी, २ मार्च, १९१० रोजी सकाळी ६.२० वाजता पू. दत्तमहाराजांचा जन्म झाला. हे या चरित्राचे नायक होत. धुंडिराजमहाराजांना एकूण पाच पुत्र व एक कन्या अशी अपत्ये झाली. तसेच, धुंडिराजमहाराज व श्रीगुळवणीमहाराज यांचा वाडीपासूनचा ऋणानुबंध होता आणि दोघेही टेंबेस्वामीमहाराजांचे अनुग्रहीत होते.

## शुद्ध व पवित्र कुळातील जन्म

*कुळीकन्या पुत्र होती जे सात्विक। तयाचा हरिख वाटे देवा॥*

या तुकाराममहाराजांच्या अभंगाप्रमाणे अशा थोर शुद्ध व पवित्र कुळात पू. दत्तमहाराजांचा जन्म झाला. पू.

दत्तमहाराज म्हणजे, 'पुन्हा कार्य करण्यासाठी वक्रतुंडमहाराजच जन्माला आले आहेत.' असे, पू. वासुदेवानंद सरस्वतीस्वामींनी सांगितले होते. पू. दत्तमहाराज झाल्यावर टेंबेस्वामी धुंडिराज महाराजांच्या घरी आले असताना, ते १-१॥ महिन्याचे होते, तेव्हा सौ. सरस्वती बाईंचे मांडीवर हे बाळ होते, त्या वेळी ते या बाळाला पाहून म्हणाले, "काय, बुवा राहिलेले कार्य पुरे करण्यासाठी नातू म्हणून आलात ना? आपण पांढऱ्या वेषात नि आम्ही भगव्या वेषात. एवढाच वरवरचा फरक आहे, बाकी काय?" असे म्हणून दोघेही एकमेकांकडे पाहून हसले. तेव्हा स्वामींनी बाळाला कुरवाळले, त्यांच्या अंगावर हात फिरविला आणि याचे नाव 'वक्रतुंड' ठेवा असे सांगून स्वामी निघून गेले होते. पू. दत्तमहाराजांचे नाव वक्रतुंड ठेवून व्यावहारिक नाव 'दत्तात्रेय' असे ठेवण्यात आले. पू. दत्तमहाराजांचे, श्री दिगंबर, श्री वासुदेव, श्री श्रीपाद व श्री गजानन हे बंधू होते व एक भगिनी पद्मावती. अशा भावंडात दत्तमहाराज वाढत होते.

## पू. दत्तमहाराजांचे बालपण

पू. दत्तमहाराजांचे बालपण वाडीत गेले. आपले पिताजी पुन्हा जन्माला आले समजल्याने, त्यांचे आई-वडील, त्यांना 'एकेरी' नावाने कधी बोलत नसत. त्यांच्या जीवनातील एक

घटना अशी की, धर्मशास्त्राप्रमाणे मूल लहान असताना, पुण्याह वाचनादि प्रयोगासह एक प्रयोग आहे. रांगत्या मुलाला औक्षण करून त्याच्या समोर सोने, (अलंकार), वस्त्र, शस्त्र (कात्री, चाकू) लेखणी, पुस्तक व द्रव्य हे ठेवले जाते. वरील पूजाविधी झाल्यावर मुलासमोर पाटावर ठेवलेल्या वस्तू दिल्या जातात, ते मूल त्यातील जी वस्तू उचलतो. त्यानुसार तो पुढील जीवन काळात त्यावर उदरनिर्वाह करणार, असे समजतात. ब्राह्मणाचे मुलाने पुस्तक लेखणीशिवाय इतर वस्तू उचलल्या तर, त्याकडे विशेष लक्ष देवून त्याच्या जीवनाला उत्तम गती देण्याचे संस्कार करावे लागतात. हा विधी अन्नप्राशन विधीतील एक प्रयोग आहे. पू. दत्तमहाराजांचे बाबतीत चैत्र हळदी-कुंकू समारंभाचे वेळी हा प्रयोग केला असावा, त्या वेळी त्यांनी हातात श्रीमद्‌भगवत्‌गीतेचे पुस्तक घेतले व जणू काही आपल्या कार्याची रूपरेषा निश्चित केल्याचे आपल्या माता-पित्यांना सांगितले असावे असेच दिसते.

एकूणच पू. दत्तमहाराज वाडीतील वातावरणात रमले होते. कृष्णमाईचे स्नान, देव दर्शन, सकाळ-संध्याकाळची आरती हे नित्याचे होते. कृष्णामाई, संत व देवस्पर्शाने पुनीत झालेल्या मातीशी पू. दत्तमहाराजांचे नाते 'बहुत सुकृताने' जोडले होते. त्यांना उत्तम पोहता येत होते. देवाला पाणी

घालणे व मनसोक्त खेळणे हे सारे बालस्वभावाला अनुसरून होते.

पू. धुंडिराजमहाराज व सौ. आईसाहेब बहुतकाळ देऊळगाव राजा येथे असल्याने, वाडीत पू. दत्तमहाराज आजीच्या सान्निध्यात बराच काळ असत. या आजी म्हणजे सौ. आईसाहेबांच्या मातोश्री तुंगभद्राबाई या होत. आठव्या वर्षी वाडीला पू. दत्तमहाराजांची मुंज झाली. आता खऱ्या अर्थाने त्यांची उपासना, श्रीगुरुचरित्र वाचन व वेदाध्ययन सुरू झाले. वाडीत पू. दीक्षितस्वामी होते. त्यांचा व कवीश्वर घराण्याचा आपुलकीचा संबंध होता. हे स्वामीसुद्धा टेंबेस्वामींचे अनुग्रहीत होते. पू. सौ. आईसाहेबांना जर प्रदक्षिणा घालावयाच्या तर त्या मुलांना स्वामींच्या इथे ठेवत व प्रदक्षिणा घालत असत. त्यामुळे मुलांशी स्वामीची जवळीक, प्रेम निर्माण झाल होत.

वाडीतील उत्सवात पू. दत्तमहाराजांचा सहभाग असे. पू. दीक्षितस्वामींबरोबर टेंबेस्वामींची पुण्यतिथी, माघप्रतिपदा, गुरूपौर्णिमा इ. उत्सवात सहभाग असे. अनेक थोर महात्मे या स्थानात येत असत, येथील उपासना, महापूजा, वार्षिक उत्सव, अन्नदान, या वातावरणाचा त्यांच्या संस्कारक्षम बालवयात एक वेगळे संस्कार पू. दत्तमहाराजांच्या मनावर

झाले. यातून ईश्वरी प्रेम, भक्तीची ओढ निर्माण झाली. येथील वैशिष्ट्य म्हणजे येथे अध्यात्म विद्येचे वस्तुपाठ प्राप्त होत होते. या विद्यापीठाचे कुलगुरू होते पू. दीक्षितस्वामी. येथे स्वामी मुलांकडून देवाची आरती करून घेत. त्यांना तूपाची निरंजने आरतीसाठी देत. त्यानंतर स्वामी प्रसाद देत. यात खारीक, बेदाणे, खडीसाखर, पेढे, कधी फळे, कधी लाडू, चिवडा असे. या माध्यमातून मुलांना परमार्थाचे वस्तुपाठ मिळत असत, यातून मुले भक्तीमार्गाला लागत असत. या वेळी आरत्या, स्तोत्र, मंत्रपुष्पांजली पाठ होत असत. प्रथम गायत्री उपासना मंत्र पू. धुंडिराजमहाराजांकडून प्राप्त झाली. नंतर मंत्रोपदेश, पू. दीक्षितस्वामींकडून प्राप्त झाला.

तथापि, पू. दत्तमहाराजांचे श्रीमद् जगद्गुरू शंकराचार्य जेरेस्वामीमहाराज यांच्या संस्कृत पाठशाळेत शिक्षण झाले. येथे काव्य व व्याकरणाचे शिक्षण झाले. अत्यंत प्रगल्भ व प्रखर बुद्धिमत्ता असल्याने थोड्या शिकवण्यात ते सर्व ग्रहण करीत असत. पुढे पू. दीक्षितस्वामी वाडीतून औरवाडला, सद्गुरू टेंबेस्वामींच्या नावे मठ स्थापना केली. आता पू. दत्तमहाराज वाडीत शिक्षणाचे पाठ झाले की, नावेतून औरवाड येथे भजन म्हणत बालगोपाळांसह जात असत. कधी पू. स्वामीजीही बरोबर असत. हास्य विनोद करीत असत.

वाडीतील पू. दत्तमहाराजांचे बालपणातील सवंगडी म्हणजे दिगंबर हवळे, बापू कोडणीकर, बाळू पुजारी, कृष्णभट, कट्टी, शिंगणापूरकर, जेरे, इ. होते.

पू. दत्तमहाराजांची गुरूभक्ती श्रेष्ठ होती. संतांच्या सहवासातील प्रेम विलक्षण असते. ज्ञान भक्ती प्रेमाचा हा वर्षाव वेगळा होता. त्यानंतर पुढील व्याकरणशास्त्राचा अभ्यास सांगली येथे व्यंकटेशशास्त्री अभ्यंकर यांचेकडे पूर्ण झाला. श्री. दीक्षितस्वामींच्या संकल्प शक्तीप्रमाणे औरवाडला 'श्री वासुदेवानंद दत्त अमरेश्वर' हा मठ निर्माण झाला. हे स्थान वाडीच्या समोरच्या तीरावर आहे. पू. धुंडिराजमहाराज ज्याप्रमाणे वाडीत भाद्रपद महिन्यात भागवत् सप्ताह करीत असत तसा पू. दत्तमहाराजांकडून पू. दीक्षितस्वामींच्या प्रेरणेनुसार औरवाडला केला. त्या वेळी पू. दत्तमहाराजांचे वय १६ वर्षांचे होते. सद्गुरूंच्या कृपाशीर्वादाचे फळ म्हणजे पुढे सुमारे ४० वर्षे पू. महाराजांनी तेथे सप्ताह केला. प्रथमच सप्ताह केला. तेव्हा यापूर्वी त्यांनी ग्रंथांचे चिंतन केले नव्हते. पण सद्गुरू कृपेने गेल्या जन्मीचे ज्ञान प्रकट झाले, आणि "ज्ञानाची सत्ता जन्मोजन्मी अबाधित कशी असते" या सिद्धांताचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे पू. दत्तमहाराज होय. या प्रथम भागवत सप्ताह समाप्तीचे वेळी पू. स्वामींनी भागवत

ग्रंथाची व बालदत्तात्रेयांची मिरवणुक काढली आणि आशीर्वाद दिले की, ''दत्ता, तू पूर्ण ज्ञानी होशील. यापुढे भागवत सप्ताह करीत जावे. या भागवत सप्ताहामुळे तुझ्याकडून फार मोठा धर्म प्रचार होईल. तू माझा प्रिय भक्त आहेस, तुझ्यावर ईश्वराची फार मोठी कृपा आहे.'' त्या वेळी पू. दीक्षितस्वामींनी बालदत्तशास्त्रींना उंची शाल पांघरली. चांदीचे संध्यापात्र दिले. यामुळे पू. दत्तमहाराजांना आनंद झाला, तसे ते ज्ञानानी गंभीर झाले. ते म्हणत असत, 'हे सारं सामर्थ्य सद्गुरूंचे आणि श्रीमद् भागवताचे आहे' हाच त्यांचा अकृत्रिम विनय होता.

सांगलीला वेदपाठ शाळेत असताना, वेळ मिळेल त्याप्रमाणे ते वाडीत येत. एकदा, आजीने सांगितले, तीन ब्राह्मण घरी जेवायला येणार, तू घरी थांब.'' तेव्हा पू. दत्तमहाराज म्हणाले, ''मी दीक्षितस्वामींकडे जावून दर्शन घेऊन येतो'' व पू. दत्तमहाराज नदी किनारी आले. नदीला महापूर, तेव्हा ते पोहून पू. दीक्षितस्वामींकडे आले. तेथेच स्वामींनी प्रसाद घेण्यास सांगितले. गुरू आज्ञा म्हणून प्रसाद ग्रहण केला. परत येताना पुन्हा पोहत निघाले. तो पाण्यातील भोवऱ्यात महाराज अडकले. त्यांनी दत्तप्रभूंचे स्मरण केले. तेव्हा श्री दत्तप्रभूंनी त्यांना यातून बाहेर काढले. हे वर्णन ते

अत्यंत सद्गतित अंतःकरणाने ते सांगत असत. अशा प्रकारे वाडीच्या मातीशी, तेथील गुरूकृपेचे अविभाज्य नाते होते. कृष्णामाईच्या स्नेहातील वात्सल्याने त्याचे बालपण हे समृद्ध झाले होते.

## धर्मशास्त्रानुसार गृहस्थाश्रमात प्रवेश

पिताजी धुंडिराजमहाराज व पू. सौ. आईसाहेब यांचे वास्तव्य देऊळगाव राजा येथे असे. तथापि, संपूर्ण महाराष्ट्रभर दौरा असे. प्रवचन, वाचन, पुराण या माध्यमातून धर्मप्रचार व प्रसाराचे कार्य अव्याहत करीत असत. असेच बार्शी येथेही त्यांचा शिष्य परिवार होता. या शिष्य परिवारात श्री. भगवंतराव पाठक नावाचे पू. धुंडिराजमहाराजांचे अनुग्रहीत होते. त्यांची कन्या 'सुंदर' म्हणून होती. त्यांच्या आईचे निर्याण झालेले होते. पू. धुंडिराजमहाराजांनी पू. दत्तमहाराजांचा विवाह या सुंदरशी निश्चित केला आणि दि. २९/३/१९२९ रोजी हा विवाह संपन्न होऊन चि. सौ. कां. सुंदर ही सौ. लक्ष्मीबाई पू. दत्तमहाराजांच्या धर्मपत्नी झाल्या.

सौ. लक्ष्मीबाईंनी आपल्या सासूबाईकडून घरातील रीतीरिवाज, कुलधर्म-कुलाचार सर्व काही माहिती करून घेतले, आणि आयुष्यभर हा कवीश्वर घराण्याचा 'वसा' सांभाळला. सौ. लक्ष्मीबाईंनी सासूबाई जी व्रत-वैकल्ये आणि

नेम करीत असत ते त्यांनी केले होते. श्रीदत्तमाहात्म्याचा एक अध्याय वाचणे, वेळ प्रसंगी सप्तशती गुरुचरित्राची पारायणे करणे या ईशभक्तीच्या गोष्टी त्यांनी मनापासून सांभाळल्या होत्या. थोडे दिवसातच त्या कवीश्वर घराण्याशी समरस झाल्या होत्या. घरात अखंड धर्मचर्चा, व्रतांचे पालन, नित्य नैमित्तिक कर्मे, हे सगळे होत असे. तथापि, पू. दत्तमहाराज मात्र अबोल, गंभीर स्वभावाचे. अत्यंत साधी राहणी, यांनी प्रथम काही दिवस गोंधळून गेल्या होत्या, पण पुढे त्यांना याची सवय झाली.

अशा या पारमार्थिक बैठकीवर पू. दत्तमहाराजांची संसार वेल ही तीन मुले, तीन मुलींसह भरून गेली होती.

पू. दत्तमहाराजांचा विवाह झाला होता, तरी पुढील अध्ययनही सुरू होते. धारवाडला पंडित श्री नागेशशास्त्री उप्पनबेटगिरी यांचेकडे सर्व शास्त्रांचे अध्यायन पूर्ण झाले. त्यानंतर काशी क्षेत्री श्री राजराजेश्वरशास्त्री यांचेकडे अध्ययन झाले. धारवड येथे शृंगेरीच्या शंकरचार्यांनी असे म्हटले होते की, ''आपल्या या विद्यावंशामध्ये दत्तात्रेयशास्त्री हे प्रदीपक शिष्य रत्न आहे.'' अशी ही दैवी गुणसंपन्न विभूती म्हणणे यथार्थ होईल. अनेक लहान-मोठे प्रसंग प्रपंचात गृहस्थाश्रमात आले-गेले, तरी सौ. लक्ष्मीबाईंची साथ त्यांना लाभली

होती. त्यामुळे ज्ञानदेवांच्या शब्दात म्हणता येईल. "**आजी संसार सुफलग झाला गे माये॥**"

सन् १९३७ साली पू. दत्तमहाराज पुण्यात आले. पुण्यातील आचार्यांच्या मठात न्याय व वेदांत हे विषय ते शिकवू लागले. आता पुण्यात ५६० शनिवार पेठ, सरदार ग. या. ऊर्फ दादासाहेब नातू यांचे वाड्यात बिऱ्हाड मांडले. तथापि, हे मोठे सत्पुरुष आहेत, विद्वान आहेत, म्हणून त्यांचेकडून त्यांनी घरभाडे घेतले नाही. तर घरमालक आपल्याकडून घरभाडे घेत नाही म्हणून जागा सोडणारे हे बिऱ्हाड म्हणजे, एकनाथ महाराज म्हणतात त्याप्रमाणे, '**नाथांकडील उलटी खूण, पाण्याला लागली तहान।**' प्रमाणे हे घडल आणि सात वर्षांनी हा वाडा सोडला. त्यानंतर पुण्यात, शनिवार पेठ, कन्याशाळेसमोरील वर्तक वाड्यात बिऱ्हाड मांडले. प्रपंच्यात अनंत अडचणी होत्या, पण संसारातील एकमेकांच्या साथीने प्रपंचाचा आनंद '**भाग गेला क्षीण गेला। अवघा झाला आनंद ॥**' प्रमाणे सार, सार घडत होत.

पुण्यात आल्यावर मीमांसा विद्यालयात सुब्बाशास्त्री यांचेकडे मीमांसा विषयाचे अध्ययन झाले होते. एका वेळी अध्ययन व अध्यापन दोन्ही करणारे हे आगळं व्यक्तीमत्व

होते. हॉवर्ड विद्यापीठाचे एक प्रोफेसर रंगाल हे वेदान्ताच्या अध्ययनासाठी पू. दत्तमहाराजांकडे येत असत. याबरोबर उपासनाही सुरू असावयाची. श्री गुरूचरित्र द्विसहस्त्रीची पारायणेही करीत असत. जप, अनुष्ठान हेही घडतच असे. हे सर्व पहाटे करावयाचे. पुण्यातील मुक्कामात वेदाध्ययन शिकण्यास विद्यार्थीही असत. असे वेदाच्या स्पंदानी घरातील सारं वातावरण भारावलेले असे. असे हे ज्ञानदानाचे कार्यही घडत असे. स्वतः पू. दत्तमहाराज हे स्वावलंबी व अनपेक्ष वृत्तीचे असल्याने त्यांना समजून घेणे यातच भाग्य असावयास पाहिजे. ही अनपेक्ष वृत्ती ही एक दैवी देणगी आहे. कोणाकडून कसलीच अपेक्षा नसणे हा एक साधनेचा अभ्यास म्हणावा लागेल. तथापि १९८१ मध्ये गोखलेनगर मध्ये 'रेणुका निवास' हा स्वतःचा वास्तू त्यांनी उभा केला आणि याच वास्तूत त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

## योगीराज गुळवणीमहाराजांचा संबंध

श्री योगीराज गुळवणीमहाराज २० नारायण पेठ, पुणे येथे राहात होते. पूर्वीचा पू. धुंडिराजमहाराज व पू. योगीराज गुळवणीमहाराजांचा स्नेह होता. पुण्यातील मुक्कामात हा संबंध आता दृढ होऊ लागला. यांच्यात अत्यंत जवळीक झाली. प्रथम पुण्यात शंकराचार्य मठात शिरोळकरस्वामींच्या आज्ञेनुसार

अध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर सन १९४५ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत विभागात न्यायशास्त्र व मीमांसा या विषयाच्या अध्यापनाची नोकरी मिळाली. हे प्रपंच्याच्या पूर्ततेसाठी जरी केले तरी, मूळ आध्यात्मिक पिंड असल्याने ते या चिंतनातच सातत्याने असत. याच काळात पू. गुळवणीमहाराजांकडून त्यांना योगदीक्षाही प्राप्त झाली. १९६१ च्या पानशेत धरण फुटीनंतर पू. गुळवणीमहाराजांसाठी एक आश्रम करावा या दृष्टीने सर्व भक्त मंडळी एकत्र आली, तशी त्यांनी उपाय योजनाही केली. आणि पाहता पाहता पुण्यात कर्वे रोडवर, एक सुंदर वास्तू निर्माण झाली. यात पू. दत्तमहाराजांचे योगदान मोलाचे ठरले. त्यानंतर या नवनिर्माण वास्तूत अनेक सोहाळे संपन्न झाले. पू. गुळवणीमहाराजांचा अमृत महोत्सव, सहस्त्रचंद्र दर्शन, रौद्र शांत, अनेक यज्ञ-यागादि कर्मे उत्तम रीतीने संपन्न झाली. अन्नदान झाले. ज्ञानसत्रे झाली. शंकराचार्यांपासून अनेक संत-महंतांचा सहवास व प्रेम या आश्रमाला प्राप्त झाले. पर्यायाने पू. दत्तमहाराजांनाही याचा लाभ मिळाला. १९६५ पासून दरवर्षी आश्रमात श्रीमद्भागवत सप्ताह संपन्न झाला. पुण्यात श्रीमद्भागवत ग्रंथाचे प्रेम पू. दत्तमहाराजांमुळे वाढले, भक्ती-ज्ञानाचा प्रसार त्यांनी केला.

पू. योगीराज गुळवणीमहाराजांनी या वासुदेव निवासाचे प्रधान विश्वस्त व उत्तराधिकारी म्हणून पू. दत्तमहाराजांची नियुक्ती केली. ही जबाबदारी समर्थपणे पू. दत्तमहाराजांनी सांभाळून आश्रमाची परंपरा जपून सर्वत्र कीर्तिचा गंध पसरविला. पू. सद्गुरू वामनरावजी गुळवणीमहाराजांच्या बद्दल उतराई व्हावे, त्यांचे कार्य दूरवर पसरावे म्हणून पू. दत्तमहाराजांनी 'वामन निवास' ही वास्तू उभी करून कार्याची पताकाही आसमंतात फडकविली. तसे गुरूंचे चिरंतन स्मारक केले. तुळजाभवानी आरोग्यधाम ट्रस्ट करून स्त्रियांच्या आरोग्याच्या सुविधा निर्माण केल्या तसेच, आपल्यानंतर या आश्रमाचे उत्तराधिकारी व प्रधान विश्वस्त योगतपस्वी पू. नारायणकाकामहाराज ढेकणे म्हणून हे काम पाहतील हे लिहून ठेवले. क्षणार्धात सर्वस्वाचा त्यागही त्यांनी केला. तसेच पू. दीक्षितस्वामींनी निर्माण केलेल्या श्री वासुदेवानंद सरस्वती पीठाचा जीर्णोद्धारही त्यांनी केला. कृष्णामाई पर्यंतचा घाटही बांधून गुरूसेवाही केली.

अशा प्रकारे कार्य करीत असताना, पू. दत्तमहाराजांची साठी-शांत, अमृत-महोत्सव, सहस्त्रचंद्र दर्शन, रौद्रशांती इ. शांतीचे कार्यक्रम, अनेक यज्ञयाग होऊन सर्वांना परमेश्वर साक्षात्काराची अनुभूती त्यांच्याकडून प्राप्त झाली.

# पू. दत्तमहाराजांच्या कार्याचा आढावा

पू. दत्तमहाराजांच्या परमार्थाच्या प्रांगणातील कार्याचा आढावा घेणे म्हणजे माझ्यासारख्या सामान्य हातांनी गगनाला गवसणी घातल्यासारखे होईल. तथापि, स्थूल रूपाने याचा आढावा घेऊ या.

१) पू. वासुदेवानंद टेंबेस्वामीमहाराजांचे सुमारे १२ खंडाचे पाच हजार पृष्ठांचे वाङ्मय एकत्र करून ग्रंथ प्रकाशित करणाऱ्या समितीचे कार्यवाह होते. या कार्यात पू. दत्तमहाराजांचे मोलाचे योगदान होते.

२) 'वेदान्त पारिजात सौरभ' या निंबार्काचार्यांच्या ब्रह्मसूत्रावरील एका ग्रंथाचे मराठीत अनुवाद करून या ग्रंथाचे महत्त्व सांगतानाच, त्यांची ११८ पानांची प्रस्तावना लिहीली आहे. यातून त्यांच्या प्रकांड पांडित्याचा अनुभव येतो.

३) सर्व दर्शन संग्रहावर मौलिक टीकाही त्यांनी लिहीली आहे.

४) पू. श्री वासुदेवानंद सरस्वतीस्वामींचे चरित्र लिहीले आहे.

५) ६५ वर्षे श्रीमद्भागवताची सेवा केली. संबंध भारतात हे सप्ताह करून भक्ती, ज्ञान, कर्म व धर्माचा प्रचार व प्रसार केला. तसेच, पू. दत्तमहाराजांना संस्कृत, मराठी, कानडी भाषा अवगत होत्या.

६) अनेक ग्रंथांना व पुस्तकांना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. प्राचीन ग्रंथांचे परिशीलन, मनन, संशोधन व त्याचे विवरण हे कार्य त्यांनी आजन्म केले.

७) समाजातील सर्व संप्रदाय, पंथ यांच्यात जवळीक निर्माण करून प्रत्येकात ऐक्य घडविण्याचे कार्य केले. सर्व पिठाधीश एका व्यासपीठावर आणून एकात्मतेचे कार्य त्यांनी केले.

८) पू. श्रीधरस्वामींच्या मार्गदर्शनाप्रमाणे अनेक वर्षे तुळजापूर व गाणगापूर वारी पू. गुळवणीमहाराज करीत असत. तीच परंपरा पू. दत्तमहाराजांनीही अनेक वर्षे सांभाळली. याबरोबर बार्शीला भगवंताचे मंदिरात, देऊळगाव राजा व वाडीला वार्षिक प्रवचन सेवा आवर्जून करीत असत.

९) श्री गुरुचरित्र अखंड पारायण संख्या, १९५५ च्या प्रारंभापासून कार्यात सहभाग आणि १९७५ नंतर या ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून कार्य पाहिले होते.

१०) प. पू. धुंडिराजशास्त्री कविश्वर ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्य पाहिलं.

११) श्री गुळवणीमहाराजांकडून प्राप्त झालेल्या शक्तिपात सांप्रदायाचे उत्तराधिकारी पद आणि श्री धुंडिराजमहाराज कवीश्वर यांचेकडून गुरूगृहाचे अधिकार ही दोन्ही गुरूपदे त्यांनी सांभाळली.

# अनेक महात्म्यांचा सहवास व कृपाशीर्वाद

- पू. धुंडिराजमहाराज कवीश्वर, पिताश्री, गायत्री मंत्र देणारे गुरू तसेच, घराण्यातील गुरू गृह म्हणून अधिकार प्राप्त.
- ब्रह्मीभूत पू. नृसिंहानंद सरस्वती दीक्षितस्वामी, अमरेश्वर वाडी, मंत्रदीक्षा गुरू.
- कांची कामकोटी, शंकराचार्य यांचे कृपाशीर्वाद
- ब्रह्मीभूत पू. श्रीधरस्वामीमहाराज, सज्जनगड, येथे स्पर्शदीक्षा गुरू
- ब्रह्मीभूत पू. शिरोळकरस्वामी पीठाचार्य, पुणे.
- ब्रह्मीभूत पू. यती नारायणानंद सरस्वतीस्वामी, उगार
- ब्रह्मीभूत पू. गजाननाश्रमस्वामी, वाराणसी-पुणे
- पू. योगीराज गुळवणीमहाराज, योगदीक्षा गुरू.
- पू. नानामहाराज तराणेकर, इंदौर.
- पू. नारायणमहाराज, बेट केडगाव
- पू. काजळकरमहाराज, जालना
- पू. प्रल्हादमहाराज काळे, साखरखर्डा

# कृतार्थ जीवनाची सांगता

मधूमेहाच्या विकारानी सौ. आईसाहेब (लक्ष्मीबाई) आजारी असत. त्या वेळी पू. दत्तमहाराज शांतपणे त्यांना धीर देत असत. अखेर दि. १०/१/१९९९ रोजी पू. सौ. आईसाहेब या अनंतात विलीन झाल्या.

पुढे पू. दत्तमहाराजांना भागवतातील उद्धवासारखी भक्तीप्रेमाची अवस्था प्राप्त झाली होती. तसेच, त्यांचे ठिकाणी गोपीभावही प्रकट झालेला सर्वांनाच जाणवत होता. शरीर क्षीणतेने नित्य कर्म जमेना, तेव्हा जणू काही अन्न ग्रहण न करण्याचा निर्णय करून अखंड भगवद् चिंतनात राहून भिष्माचार्यांनी जसे मन हे भगवंताला अर्पण केले, तसे ते 'नारायण भज रे मानसा नारायण भज।' असे जणू मनाला बजावीत दि. १ मार्च, १९९९ रोजी सकाळी सूर्योदय झाल्यावर, त्याच्या सुवर्ण कांतीच्या प्रभाकिरणात पू. दत्तमहाराजांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली. या वेळी एक आश्चर्यकारक घटना घडली की, ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात वर्णन केलेल्याप्रमाणे, त्या वेळी त्यांच्या पार्थिव शरीरावर सुवर्णाची कांती प्रकट झाली होती.

असे हे पू. दत्तमहाराज कवीश्वर, की त्यांच्या ठिकाणी परिपूर्ण ऋजुता, आदर्श विशुद्ध ध्येयवाद, मनोबल वाढविणारी वाक्सुधा, लोकोद्धारासाठी तळमळ, भक्ती प्रेमाची दीक्षा देणारे, पाहताच प्रसन्नता व शांतता देणारे दर्शन, तसेच दैवीगुणांनी मंडित सर्वत्र सतत गुणदृष्टीने पाहणारे गुणदर्शी, परब्रह्म शांती सेवन केलेले जणू चैतन्याचे महापुरुष, असे हे हिमालयासमान असणारे पू. दत्तमहाराजांचे दर्शन काळाच्या उदरात जरी विसावले असले तरी, श्रीकृष्ण म्हणतात, तसे आजही पू. दत्तमहाराजांचे दर्शन स्मर्तुगामि असून, त्यांचा शब्दन् शब्द अंतःकरणात वीणेचा झंकार व माधुर्य रूपाने श्रीकृष्णाचा मुरलीनाद हा ऐकू येतो. या विशाल व्यक्त व अव्यक्त जगतात, हाच एक आधार!

*भरोनी सद्भावाची अंजुली। मियां वोविया फुले मोकळी।*

*अर्पिली, आंघ्रि युगुली। विश्वरुपाचिया।।*

- ज्ञानेश्वरी ११.७०८

## पू. दत्तमहाराज कवीश्वर यांना प्राप्त झालेल्या पदव्या....................

- २ जुलै, १९६१ दिल्ली : भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते ''विद्यावाचस्पती''पदवी प्रदान. ''देववाणी संस्कृतमध्ये अनन्यसाधारण वैदुष्याबद्दल'' असा गौरव.
- १९ मार्च, १९७७ पुणे : वेदशास्त्रोत्तोजक सभा, पुणे यांची ''न्यायचूडामणि'' पदवी प्रदान.
- २ सप्टेंबर, १९७९ पुणे : श्री द्वारका शारदा पीठाधीश्वर श्रीमद् शंकराचार्यांकडून ''महामहोपाध्याय'' पदवी प्रदान
- २९ मे, १९८३ : 'ब्रह्मर्षी पदवी प्रदान, श्रीमन् समर्चनाथ नालम प्रयागवासिनः
- ९ जून, १९८३: अखिल भारतीय महाराष्ट्र-तीर्थ पुरोहित संघ, वाराणसी यांच्या तर्फे ''योग वेदान्त सार्वभौम'' पदवी प्रदान
- 'महर्षी' पदवी प्रदान, श्री महासिद्ध योग मंडल संघ

## पू. दत्तमहाराज कवीश्वर यांना सन्मानाने पुरस्कार प्रदान....................

- १९५७ : श्रीमद् कांची कामकोटी पीठाधीश्वर शंकराचार्यांकडून सुवर्णकंकण आणि सन्मानपत्र
- १८ डिसेंबर, १९६८ दिल्ली : भारत सरकारचे ''राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार''
- २५ मे, १९६९ महाराष्ट्र-कर्नाटक भगवद्भक्त ५१ संस्था संचालकांकडून सन्मानपत्र ''कोविदचूडामणि व वेदशास्त्रार्थतत्वज्ञ'' असा गौरव.
- २१ एप्रिल, १९७० दिल्ली : भारताचे राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते 'राष्ट्रीय पंडित' ही पदवी प्रदान. ''संस्कृत में पांडित्य तथा शास्त्रनिष्ठा के लिए यह प्रमाणपत्र प्रदान'' असा गौरव.
- ९ फेब्रुवारी, १९८९ : श्री देवदेवेश्वर संस्थान पर्वती, कोथरूड यांच्यातर्फे श्रीमंत नानासाहेब पेशवे धार्मिक व आध्यात्मिक पुरस्कार.
- १९९० पुणे : महर्षी वेदव्यास प्रतिष्ठानतर्फे पू. श्री किशोरजी व्यास यांच्या हस्ते ''महर्षी वेदव्यास'' पुरस्कार प्रदान.
- १९ नोव्हेंबर, १९९० पुणे : श्री गुरुचरित्र अखंड पारायण संस्था आनंदाश्रम, पुणे यांच्यातर्फे श्री चिं. ग. काशीकर यांच्या हस्ते गौरव
- १९९० : दाते पंचागकर्ते यांच्यातर्फे सन्मानदर्शक स्मृतिचिन्ह प्रदान
- १९९३ पुणेःत्वष्टा कासार समाज संस्था, पुणे यांचेतर्फे सन्मानदर्शक स्मृतिचिन्ह प्रदान
- ४ ऑगस्ट, १९९४ : श्री क्षेत्र आळंदी ब्रह्मवृंद अनुष्ठान मंडळ यांच्यातर्फे सन्मानपत्र.
- १४ मे, १९९५ : श्रीमद् शंकराचार्य करवीर पीठ कोल्हापूर यांच्यातर्फे सांस्कृतिक पुरस्कार.

## प.पू. श्री दत्तमहाराजांचे प्रकाशित साहित्य

| अनु. | पुस्तकाचे नाव | अनु. | पुस्तकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | बोल अमृताचे | ११ | भक्तिप्रदीप |
| २ | दैवी संपदा | १२ | श्रीमत् देवी भागवत |
| ३ | द्विसाहस्त्री १ | १३ | श्रीमत् देवी भागवत |
| ४ | चांदणे कैवल्याचे | | खंड ३ |
| ५ | द्विसाहस्त्री २ | १४ | द्विसाहस्त्री-नवीन- |
| ६ | नारायणी नमोस्तुते | | खंड १, २ |
| ७ | सत्कर्मी रति वाढो | १५ | आनंदलहरी |
| ८ | विचारधन १ | १६ | श्री सप्तशती गुरुचरित्र सार |
| ९ | संतसंग | १७ | द्विसाहस्त्री सटीक |
| १० | विवेकचूडामणि-१ | १८ | प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा पत्रसंग्रह |

हे ग्रंथ उपलब्ध : श्रीदत्ताश्रम संस्थान, सद्गुरु नगर, न्हावा रोड, जालना - ४३१२०३.

## संदर्भ ग्रंथ


*१) श्री धुंडिराज लिलामृत ले. श्री. दामले, बुलढाणा*

*२) श्री दत्त वाक्सुधा, ले. अ. सी. पोटभरे, पुणे*

*३) श्री दत्तमहाराज चरित्र व वाङ्मय*
*डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर*

*४) प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती, टेंबेस्वामी आणि परंपरा*
*लेखक व संपादक श्री सुहास मधुकर जोशी*

५) वेबसाईट - *www.dattamaharaj.kavishwar.org*

